



RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com

Mob- 9822720784






वर्ष ३ रे अंक : १८२ वा बुधवार दि 03 सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# जरांगे पाटलांचा विजयी गुलाल, छगन भुजबळांनी सुरू केल्या हालचाली; पडद्याआड काय घडतंय?

वृत्तसंस्था/मुंबई

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती राज्य सरकारने मंगळवारी अखेर जाहीर केल्याने एकीकडे मराठा समाज जल्लोष करत असून, दुसरीकडे ओबीसी नेत्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. ज्येष्ठ ओबीसी नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांनी मंगळवारी याबाबत सावध भूमिका घेतली असून पडद्याआडून हालचाली सुरू केल्या आहेत. राज्य सरकारच्या निर्णयावर भुजबळ वकिली सल्ला घेत आहेत; तसेच त्यांनी ओबीसी मंत्री आणि नेत्यांशी संपर्क साधल्याचे कळते. आज, बुधवारी होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ओबीसी मंत्री सरकारने प्रसृत केलेल्या दोन्ही जीआरविषयी मुख्यमंत्री आणि मुख्य सचिवांकडून माहिती घेणार असल्याचे कळते. राज्य सरकारने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी हैदराबाद गॅझेटबाबतची मनोज जरांगे पाटील यांची मागणी मान्य केल्याचा शासन निर्णय प्रसृत केला; तसेच पश्चिम महाराष्ट्रातील मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सातारा गॅझेटला मान्यता देण्यासाठी महिन्याचा कालावधी घेण्यात आला आहे. मराठा समाजाला ओबोसी प्रवर्गात समाविष्ट करू नये यासाठी ओबीसी समाज आक्रमक झाला आहे. या घडामोडींनंतर भुजबळ यांनी थेट प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. जीआरमधे अनेक बाबी संदिग्ध असून, त्यावर काहीही स्पष्टता नसल्याचे ओबीसी नेत्यांनी खासगीत म्हटलं आहे. हैदराबाद आणि इतर गॅझेट नोंदींचा वापर करून मराठ्यांना कुणबी जात प्रमाणपत्रे देण्यास राज्य सरकारने



संमती दिली आहे. त्यामुळे मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन मागे घेतले असले, तरी येथे सुरू असलेले ओबीसी आंदोलन सुरूच राहील, असे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी स्पष्ट केलं. राज्य सरकारने ओबीसींशी चर्चा करण्यासाठी प्रतिनिधी नियुक्त करेपर्यंत; तसेच १३ कलमी कार्यक्रमाचा स्वीकार करेपर्यंत महासंघ आंदोलन मागे घेणार नाही. सरकारने जरांगे यांच्याशी चर्चा केली. तशाच प्रकारे ओबीसींसोबतही चर्चा व्हायला हवी, अशी मागणी त्यांनी केली.

राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे संविधान चौकात ३० ऑगस्टपासून आंदोलन सुरू आहे. ओबीसी समाजाने हे आंदोलन मागे घ्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. मात्र महासंघ आंदोलनावर ठाम आहे. मराठा समाजाला गॅझेटनुसार आरक्षण देण्याच्या निर्णयाचा महासंघाने तीव्र विरोध केला आहे. ओबीसींच्या आरक्षण कोट्यात मराठा समाजाची ही मागच्या दाराने एंट्री असल्याचे म्हटले आहे. सरकारचा हा ताजा निर्णय ओबीसी आरक्षणावर थेट हल्ला असल्याचा संताप व्यक्त होत आहे.

## सुट्टीच्या दिवशी तहसील कार्यालयात २४ तास लखलखाट!

### विजेची काटकसर कोण करणार?

जनसंचलन/मोताळा

मोताळा तहसील कार्यालयात दिवस आणि रात्र असे २४ तास लाईट झगमगत असल्याचे चित्र असून,विजेची काटकसर कोण करणार? असा प्रश्न सुज्ञ नागरिकांना पडला आहे. विजेची बचत करणे सध्या काळाची गरज बनली आहे. मागणीपेक्षा विजेचा पुरवठा कमी असल्यामुळे नागरिकांना भारनियमनाचा सामना करावा



लागतो. परंतु, प्रत्येकाने विजेचा वापर करताना काळजी घेतली तर भरपूर विजेची बचत होऊ शकते. एकीकडे शासन व प्रशासन विजेची बचत करण्यासाठी जनजागृती करतात. नागरिकांना उपदेशाचे डोज पाजतात.मात्र मोताळा तहसील प्रशासनाकडून गत चार-पाच दिवसांपासून विजेची काटकसर होत नसल्याचे उदासिन चित्र असून २४ तास कार्यालय व परिसरातील लाईट सुरु आहेत.

## बुलढाणा शहरात रस्त्यावरच रंगतो जुगाराचा डाव !

जनसंचलन/बुलढाणा

तालुका आणि शहरात अवैध दारू विक्री तसेच जुगाराविरुद्ध पोलिसांकडून सतत कारवाई सुरू असतानाही जुगाऱ्यांनी नवा डाव आखल्याचे समोर आले आहे. बुलढाणा शहरात आता रस्त्यांवरच मटका जुगार खेळवला जात असल्याची गंभीर माहिती पोलिसांच्या तपासातून उघड झाली आहे. या प्रकारामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सोमवारी शहर पोलिसांची गस्त सुरू असताना सुंदरखेड परिसरातील काँग्रेसनगर भागात रस्त्यावरच एक व्यक्ती मटका जुगाराच्या चिठ्ठ्या वाटताना दिसला. सार्वजनिक ठिकाणी



सर्रास जुगार खेळवला जात असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी तातडीने धाड टाकली. अचानक कारवाईमुळे काहीजण पळून गेले; मात्र संजय रामप्रसाद पातालबंसी (वय ४७, रा. परदेशीपुरा, बुलढाणा) याला घटनास्थळी ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून २,३५० रुपयांची रोकड, मटक्याच्या चिठ्ठ्या आणि जुगाराच्या तपशीलवार नोंदी असलेली डायरी जप्त करण्यात आली आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सावध ऐका मैत्रीच्या हाका

## संपादकीय लेख



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जपान आणि चीनचा दौरा, चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी त्यांची चर्चा; तसेच चीनमधील तियानजिन येथे ङ्गशांघाय सहकार्य परिषदेफच्या (एससीओ) बैठकीला त्यांची उपस्थिती आणि तिथे रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी झालेला संवाद या साऱ्या गोष्टी भारताच्या परराष्ट्र धोरणाचे बदलत असलेले आयाम दर्शवतात. अमेरिकेने भारतावर पन्नास टक्के आयातशुल्क लागू केल्यानंतर दोन्ही देशांतील संबंध ताणले गेल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांचे हे दोन्ही दौरे झाल्याने त्यांचे महत्त्व केवळ द्विपक्षीय संबंधांपुरते मर्यादित नाहीत. भारत आणि जपान यांच्यात पूर्वीपासूनच सौहार्द आहे; परंतु मोदी यांच्या कार्यकाळात ते वाढीला लागले आहे. मात्र, भारत आणि चीन संबंधांतील तणाव खुद्द मोदी यांच्या कार्यकाळातच विकोपाला गेला होता. प्रथम डोकलाम आणि नंतर लडाख येथे नियंत्रण रेषेवरून चीनने घुसखोरी केल्यानंतर पाच वर्षांपूर्वी दोन्ही देशांत लष्करी संघर्ष झाला. मात्र, तरीही परस्परांशी संवाद सुरू ठेवण्याची पद्धत उभय देशांनी कायम ठेवली होती. गेल्या वर्षी मोदी आणि जिनपिंग हे दोघे रशियात ङ्गब्रिक्सफ परिषदेच्या पार्श्वभूमीवर भेटले. सीमेवरील तणाव कमी करण्याबाबत आणि सैन्य माघारी घेण्याबाबत दोहोंत त्या वेळी चर्चा झाली आणि त्यानंतर कृतीही झाली. अशा प्रकारे दोहोंतील परिस्थितीत सुधारणा होत असताना हे दोन्ही नेते ङ्गएससीओफ बैठकीच्या पार्श्वभूमीवर चीनमध्ये भेटले. ङ्गदोन्ही देश एकमेकांचे भागीदार आहेत, स्पर्धक नाहीत,फ असा संदेश देऊन उभय नेत्यांनी परिस्थिती सामान्य करण्यासाठी उचललेली पावले आश्वासक म्हणता येतील. रशियाकडून स्वस्तात तेल घेत असल्याच्या कारणावरून ट्रम्प प्रशासनाने भारतावर अतिरिक्त आयातशुल्काचा भार लादला आहे. भारतावर दबाव आणण्याचा आणि त्याच्या परराष्ट्र धोरणात ढवळाढवळ करण्याचाच हा प्रकार. आपल्या स्वतंत्र परराष्ट्र धोरणाचा बाणा भारत कायम राखत आला आहे. त्यामुळे मोदींनी केलेला त्याचा उल्लेख महत्त्वाचा ठरतो. भारत आणि चीन यांच्यातील संबंधांकडे तिसऱ्या देशाच्या चष्म्यातून पाहिले जाऊ नये, असे मोदींनी म्हटले असले, तरी आजच्या कमालीच्या वैश्वीकरण झालेल्या जगात तसे होणे स्वाभाविकच. दोन्ही देशांनी विविध क्षेत्रांतील सहकार्य वाढीस नेताना समान हितांना प्राधान्य द्यावे, ही जिनपिंग यांची अपेक्षा रास्त म्हणावी लागेल. दोन्ही देशांमध्ये सीमाप्रश्न आहे; परंतु तो उभय देशांमधील संबंधांमध्ये अडथळा असता कामा नये, हे त्यांचे म्हणणेही चुकीचे नाही. भारत आणि चीन यांचे आजवरचे संबंधही या अडथळ्याला पार करूनच पुढे सरकत आलेआहेत. मात्र, चीन हा भरवशाचा साथीदार नाही याकडे भारताने अजिबात काणाडोळा करू नये. एकीकडे भारतासाठी मैत्रीचा हात पुढे करतानाच दुसरीकडे तो सीमावाद उकरून काढून भारतीय हद्दीत आक्रमण करतो, असा इतिहास आहे. त्यामुळे चीनबरोबरील मैत्रीत सतत सावधानता बाळगणे गरजेचे आहे. दोन्ही देशांमधील सीमाप्रश्न ङ्गजैसे थेफ ठेवून संबंध वृद्धिंगत करणे महत्त्वाचे आहेच; परंतु चीनच्या आहारी जाणार नाही, हे पाहावे लागेल. यापूर्वीचा अनुभव लक्षात घेऊन भारत याबाबत काळजी घेईल, अशी अपेक्षा आहे. एससीओफ बैठकीत पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध होणे आणि तो घडवून आणणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होणे भारतासाठी महत्त्वाचे होते. पाकिस्तान हाही ङ्गएससीओफचा सदस्य देश असून, त्याची आणि चीनची मैत्री ख्यात आहे. पाकिस्तानकडून भारतात होत असलेल्या दहशतवादी कारवायांवर आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर चीन पांघरूण घालत आला आहे. त्यामुळे ङ्गएससीओफच्या व्यासपीठावर पहलगामबाबत चीन काय भूमिका घेतो हे महत्त्वाचे होते. पहलगाम हल्ल्याचा निषेध हे भारत आणि चीन यांच्यातील नजीकता वाढल्याचे निदर्शक म्हणता येईल. पाकिस्तानमधील जाफर एक्स्प्रेसवर झालेल्या हल्ल्याचाही ङ्गएससीओफने निषेध केला. हा हल्ला तिथे बलुचिस्तानच्या मुक्तीसाठी शस्त्र हाती घेतलेल्यांनी घडवून आणला. लुचिस्तानबाबत भारताला सहानुभूती असली, तरी तेथील दहशतवादाचे नवी दिल्लीने कधीही समर्थन केले नाही. त्यामुळे जाफर एक्स्प्रेसवरील हल्ल्याचा निषेध होण्यात गैर नाही. ङ्गएससीओफच्या निमित्ताने मोदी आणि पुतिन यांच्यात चर्चा झाली. युक्रेन युद्ध संपुष्टात आणण्याबाबत दोहोंत झालेली चर्चा शांतता प्रस्थापित होण्यासाठी झालेली चर्चा महत्त्वाची आहे. स्वदेशहिताला प्राधान्य देऊन भारत स्वतंत्रपणे आपली परराष्ट्र धोरण आखतो आणि वाटचाल करतो, हे मोदी यांनी जपान आणि चीनच्या दौऱ्यातून दाखवून दिले.




## गौराई जवळ अतिवृष्टीचा देखावा!

**जनसंचलन/ केळवद**



जिल्ह्यातील काही तालुक्यांसह चिखली तालुक्यात यंदा झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांची जमीन खरबडून गेली असून, पिकवलेली पिके उध्वस्त झाली आहेत. या पार्श्वभूमीवर चिखली तालुक्यातील केळवद येथील वैष्णवी रविकांत गाडेकर व संपूर्ण गाडेकर परिवार यांनी गौरी महालक्ष्मी जवळ अतिवृष्टीचा जिवंत देखावा साकारला आहे. या देखाव्यात अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान, वाहून गेलेली शेते आणि शेतकऱ्यांची बिकट अवस्था याचे हुबेहूब चित्रण करण्यात आले आहे. मात्र या देखाव्यातून त्यांनी एक सकारात्मक संदेश दिला आहे ङ्गङ्गअतिवृष्टी झाली तरी खचून न जाता शेतकरी बळीराजांनी नव्या जोमाने, नव्या उमेदीने शेतीला सुरुवात करावी.फ्फ शेतकऱ्यांचे मनोबल वाढवण्याबरोबरच शेतीसाठी त्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या देखाव्यातून केला आहे. तसेच तेथे लावलेल्या फलकाद्वारे शासनाने सर्व शेतकऱ्यांना सरसकट मदत करावी अशी मागणी देखील करण्यात आली आहे. वैष्णवी गाडेकर यांनी सांगितले की, ङ्गङ्गगौरी महालक्ष्मी व गणपतीच्या आशीर्वादाने नक्कीच बळीचे राज्य येईल आणि शेतकऱ्यांचे जीवन पुन्हा फुलून येईल.फ्फ हा देखावा केवळ धार्मिक उत्सवापुरता मर्यादित न राहता समाजाला सकारात्मकतेचा, धैर्याचा आणि पुनर्निर्मितीचा संदेश देणारा ठरत असून, पाहणाऱ्यांकडून त्याचे भरभरून कौतुक होत आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पंजाबमध्ये भीषण पूर, १३०० गावं बुडाली, ३० जणांचा मृत्यू; आजही पावसाचा रेड अलर्ट, चिंता वाढली

**चंदीगड:** पंजाब गेल्या महिन्याभरापासून भीषण पूर संकटाला तोंड देत आहे. गेल्या महिन्याभरात राज्यात पुरामुळे ३० जणांचा मृत्यू झाला आहे आणि २.५६ लाखांहून अधिक लोक प्रभावित झाले आहेत. राज्य सरकारने याला दशकांमधील सर्वात गंभीर नैसर्गिक आपत्ती म्हणून घोषित केलं आहे. राज्यातील सतलज, बियास आणि रावी नद्यांच्या पाण्याच्या पातळीत वाढ तसेच नाल्यांमध्ये पाण्याची पातळी वाढल्याने अनेक जिल्ह्यांमध्ये मोठे नुकसान झाले आहे. त्यातच हवामान विभागाकडून आज पंजाबला पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला आहे.पुराचा सर्वाधिक परिणाम अमृतसरमध्ये झालेला दिसत आहे. येथे ३५,००० लोक प्रभावित झाले आहेत. यानंतर, फिरोजपूरमध्ये २४,०१५, फाझिल्कामध्ये २१,५६२, पठाणकोटमध्ये १५,०५३, गुरुदासपूरमध्ये १४,५००, होशियारपूरमध्ये १,१५२, एसएएस नगरमध्ये ७,०००, कपूरथलामध्ये ५,६५०, मोगामध्ये ८०००, जालंधरमध्ये ६५३, मानसामध्ये१६३ आणि बर्नालामध्ये ५९ लोक प्रभावित झाल्याची माहिती आहे. पुरामुळे पठाणकोटमध्ये सर्वाधिक ६ मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. त्यानंतर अमृतसर, बर्नाला, होशियारपूर, लुधियाना, मानसा आणि रूपनगरमध्ये प्रत्येकी तीन जणांचा मृत्यू झाला आहे. बठिंडा, गुरुदासपूर, पटियाला, मोहाली आणि संगरूरमध्ये प्रत्येकी १ जणाचा मृत्यू झाला आहे. पठाणकोटमध्ये अजूनही तीन जण बेपत्ता असल्याची माहिती आहे.यादरम्यान आतापर्यंत, १५,६८८ लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. गुरुदासपूरमध्ये सर्वाधिक ५,५४९ लोकांना वाचवण्यात आले आहे. तर फिरोजपूरमध्ये ३,३२१, फाजिल्कामध्ये २,०४९, अमृतसरमध्ये १,७०० आणि पठाणकोटमध्ये १,१३९ लोकांना




पूरग्रस्त भागातून वाचवण्यात आले. आतापर्यंत पंजाबमध्ये तब्बल १,३०० गावांचं पुरामुळे नुकसान झालं आहे. ज्यामध्ये गुरुदासपूरमध्ये ३२१, अमृतसरमध्ये ८८, बर्नालामध्ये २४, फाजिल्कामध्ये ७२, फिरोजपूरमध्ये ७६, होशियारपूरमध्ये ९४, जालंधरमध्ये ५५, कपूरथलामध्ये ११५, मानसामध्ये ७७, मोगामध्ये ३९ आणि पठाणकोटमध्ये ८२ गावे समाविष्ट आहेत. पुरात अडकलेल्या लोकांची मदत करण्यासाठी गुरुदासपूर, अमृतसर, फिरोजपूर, फाजिल्का आणि भटिंडा येथे एनडीआरएफची २० पथकं मदतकार्य करत आहेत. लष्कर, पोलिस आणि स्थानिक प्रशासन देखील बचाव कार्यात गुंतले आहे.


## मैत्रिणीमुळे ओळख, पार्टीत भेट अन् सुरु झाला आयुष्याचा नवा अध्याय; अशी आहे प्रिया-शंतनूची फिल्मी लव्हस्टोरी...

**मुंबई -** मराठी मालिका, हिंदी मालिका त्याचबरोबर वेब सीरिजमधून प्रसिद्धी मिळवणाऱ्या प्रिया मराठेचं आज पहाटे चार वाजता निधन झालं. अभिनेत्री काही काळापासून कॅन्सरसारख्या गंभीर आजाराशी झुंज देत होती. प्रियाचं वय ३८ होतं. अभिनेत्रीच्या निधनानं संपूर्ण कलाविश्वावर शोककळा पसरली आहे. प्रियानं अनेक गाजलेल्या मालिकांमध्ये काम केलं. त्याचबरोबर ती पवित्र रिश्ता या हिंदी मालिकेमध्येही झळकली. प्रिया प्रोफेशनल आयुष्यासोबतच वैयक्तिक आयुष्यामुळेही कायम चर्चेत असायची. प्रिया आणि शंतनूची लव्ह स्टोरी खूप खास आहे.सुप्रसिद्ध अभिनेते श्रीकांत मोघे यांचा मुलगा शंतनू मोघे आणि प्रिया मराठेनं २४ एप्रिल २०१२ मध्ये लग्न केलं. दोघांची लव्हस्टोरी हटके आहे. प्रिया मूळची ठाण्याची असून ती शूटिंगसाठी अंधेरीत राहायची. प्रियाची रूममेट शर्वरी लोहकरेमुळे शंतनूसोबत तिची ओळख झाली. शंतनू आणि शर्वरी आई या मालिकेमध्ये एकत्र काम करत होते. मालिका संपण्याच्या वेळेस झालेल्या पार्टीमध्ये शंतनू आणि प्रिया यांची मैत्री झाली. त्या गप्पांनी रंगलेल्या रात्रीनंतर दोघांच्याही नव्या आयुष्याची सुरुवात झाली. त्यानंतर दोघांमध्ये मैत्री वाढली. त्यांच्या मैत्रीचं रूपांतर प्रेमात झालं. दीड वर्षे डेट केल्यानंतर शंतनूने फिल्मी स्टाईलने प्रियाला प्रोपोज केलं.शंतनू प्रियाला फिल्मसिटीमधील एका ठिकाणी घेऊन गेलेला. चांदण्याच्या प्रकाशात गुडघ्यावर बसून फिल्मी स्टाईलने शंतनूने प्रियाला प्रपोज




केलं. प्रियाचं सुद्धा शंतनूवर प्रेम असल्यानं तिनं लगेच होकार दिला. मात्र, शंतनू आणि प्रियाने त्यांचं नातं गुपित ठेवण्याचा निर्णय घेतलेला. दोघांच्याही घरच्यांना त्यांच्या या नात्याबद्दल काहीच माहित नव्हतं. पण, एका पुरस्कार सोहळ्यादरम्यान शंतनूने स्टेजवरच प्रियाचं नाव घेतलं आणि घरच्यांना त्यांच्या रिलेशनशिपबद्दल समजलं. दोन्ही कुटुंबाकडून होकार असल्यामुळे त्यांचं लग्न थाटामाटात पार पडलं. शंतनू आणि प्रिया हे इंडस्ट्रीतील लोकप्रिय जोडप्यांपैकी एक होतं. मात्र, आता प्रियाच्या जाण्यानं शंतनू आणि कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.दरम्यान, प्रियाच्या कामाबद्दल सांगायचं तर तिनं २००५ मध्ये या सुखांनो या या मालिकेतून छोट्या पडद्यावर पदार्पण केलं. त्यानंतर ती चार दिवस सासूचे, तुझेच मी गीत गात आहे, तू तिथे मी यांसारख्या मालिकांमधून प्रेक्षकांच्या भेटीला आलेली. त्याचबरोबर प्रियाने कसम से या मालिकेतून हिंदी मालिकांमध्ये काम करण्यास सुरुवात केली.

## यालाच म्हणतात दिवानगी! विराट-रोहितची क्रेझ संपेना




**मुंबई:** भारतीय दिग्गज खेळाडू रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी कसोटी क्रिकेट आणि टी-२० मधून निवृत्ती घेतली आहे. या दोन्ही खेळाडूंची क्रेझ पूर्ण जगभरात पाहायला मिळेल. भारताचे हे दोन खेळाडू आता वनडे फॉरमेटमध्ये खेळताना दिसणार आहे. रोहित आणि विराट आता वनडे विश्वचषक खेळताना दिसणार असून त्यानंतर निवृत्ती जाहीर करतील असे म्हटले जात आहे. विराट आणि रोहितची क्रेझ पुन्हा एकदा अनुभवयाला मिळत आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने वृत्त दिले आहे की भारताविरुद्धच्या आगामी मर्यादित षटकांच्या मालिकेसाठी सर्व आठ ठिकाणांची तिकिटे भारतीय चाहत्यांनी विकत घेतली आहेत, तर मालिका सुरू होण्यास अद्याप ५० दिवस बाकी आहेत. हे दोन्ही क्रिकेट दिग्गजांमधील सामन्यासाठी चाहत्यांचा किती उत्साह आहे हे यावरुन दिसत आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने वृत्त दिले आहे की सिडनी आणि कॅनबेरा सामन्यांची सार्वजनिक तिकिटे देखील आधीच पूर्णपणे बुक झाली आहेत. या दौऱ्यात भारत तीन एकदिवसीय आणि पाच टी-२० सामने खेळेल१९ ऑक्टोबर रोजी पर्थमध्ये पहिल्या एकदिवसीय सामन्याने दौऱ्याची सुरुवात होईल. क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे कार्यकारी महाव्यवस्थापक (इव्हेंट्स आणि ऑपरेशन्स) जोएल मॉरिसन म्हणाले की, ङ्कआठही ठिकाणी भारतीय फॅन्सने मोठी बुकिंग केली आहे. या मालिकेसाठी चाहत्यांचा उत्साह पाहून आम्हाला खूप आनंद झाला आहे. आम्ही जागतिक दर्जाच्या सामन्याची आतुरतेने वाट पाहत आहोत.ङ्ख आता विराट आणि रोहित वनडे विश्वचषक खेळून निवृत्ती जाहीर करतील असे म्हटले जात आहे. पण ऑस्ट्रेलिया दौरा हा त्यांचा शेवटचा दौरा असून त्यानंतर ते निवृत्ती घेतील अशीही अटकळ बांधली जात आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आझाद मैदानावर तुफान गोंधळ, सुप्रिया सुळे यांची गाडी अडवली, घेराव घातला, आंदोलक आक्रमक

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी आल्या. पण मनोज जरांगे यांची भेट घेऊन परतत असताना मराठा आंदोलक आक्रमक झाले. मराठा आंदोलकांनी सुप्रिया सुळे यांना घेराव घातला. सुप्रिया सुळे कशातरी गाडीत बसल्या. पण त्यानंतर आंदोलकांनी प्रचंड गोंदळ घातला. आंदोलकांनी सुप्रिया सुळे यांची गाडी अडवली. आंदोलकांनी काही वेळ गोंधळ घातला. सुदैवाने यावेळी काही मराठा आंदोलकांनी गाडी बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले. पण बरेच मराठा आंदोलक हे गाडी अडवण्यासाठी पळत जाताना दिसले. यावेळी काही आंदोलकांनी शरद पवारांनी आमचं वाटोळं केलं, असं म्हटलं. तर सुप्रिया सुळे यांची गाडी पुढे निघाल्यानंतर आंदोलकांनी त्यांच्या गाडीवर बॉटलही फेकून मारल्या.खासदार सुप्रिया सुळे यांनी आज आझाद मैदान येथे जात मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणस्थळी भेट दिली. यावेळी मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत त्यांचं बोलणं होऊ शकलं नाही. सुप्रिया सुळे या मनोज जरांगे यांच्या भेटीसाठी मंचावर गेल्या. पण मनोज जरांगे हे झोपलेले होते. यामुळे त्यांनी इतर मराठा समन्वकांसोबत चर्चा केली. तसेच मनोज जरांगे यांना झोपेतून जाग आल्यानंतर सुप्रिया सुळे यांनी त्यांच्यासोबत बोलण्याचा प्रयत्न केला. सुप्रिया सुळे यांनी त्यांना प्रकृतीची काळजी घेण्याचं आवाहन केलं. यावेळी मनोज जरांगे यांनी मान हलवत होकार दिला. मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आज तिसरा दिवस आहे. त्यामुळे त्यांची प्रकृती खालावलेली बघायला मिळत आहे. त्यांच्यात त्राण दिसत नाहीय. दरम्यान, सुप्रिया सुळे यांनी यावेळी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. मी डॉक्टरांशी चर्चा केली. मनोज जरांगे यांनी चार दिवसांपासून काही खाल्लेलं नाही. त्यांना प्रचंड अशक्तपणा आलेला आहे. डॉक्टरांचं तेच म्हणणं होतं, चार दिवसांपासून शरीरात अन्न न गेल्यामुळे त्यांना प्रचंड अशक्तपणा आलेला आहे. त्यांना थकल्यासारखं वाटत होतं. त्यामुळे ते आराम करत होते. मी त्यांना म्हणत होते की, त्यांना उठवूच नका. पण सरपंचांचा आग्रह होता त्यामुळे मी त्यांना म्हटले की, काळजी करु नका. तब्येतीची काळजी घ्या. सगळ्यांच्या जबाबदाऱ्या आहेत.



त्यांचे घरचे सुद्धा काळजी करत असतील आंदोलकांचं म्हणणं होतं की, मी मुंबई महापालिकेला विनंती करावी. मी कालही महापालिकेच्या आयुक्तांशी संपर्क केला. या भागात स्वच्छतेचा मोठा प्रश्न येतोय. महाराष्ट्रातून सगळ्याच लोकांनी अन्नाचा प्रश्न सोडवलेला आहे. सगळ्यांचं म्हणणं आहे, महापालिका प्रशासनाला सांगून इथे टॉयलेच्या स्वच्छतेबाबत, तसेच मैदानात चार लाईट्सची व्यवस्था व्हावी. स्वच्छतेची मागणीदेखील सर्वात महत्त्वाची आहे. इथे प्रचंड अस्वच्छता आहे. त्यामुळे मी प्रशासनाला विनंती करणार आहे, असी प्रतिक्रिया सुप्रिय सुळे यांनी दिली.

# वाल्मिक कराडची सुटका नाहीच; संतोष देशमुख हत्याप्रकरणी जामीन अर्ज फेटाळला

**बीड :** बीडमधील मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात मुख्य आरोपी असलेल्या वाल्मिक कराडला मोठा झटका बसला आहे. ते म्हणजे, त्याचा तुरुंगातील मुक्काम आणखी वाढला आहे. कारण, बीडच्या जिल्हा व विशेष सत्र न्यायालयात वाल्मिक कराडच्या जामीन अर्जावर आज सुनावणी पार पडली. या दरम्यान न्यायालयानं आरोपी वाल्मिक कराडचा जामीन अर्ज फेटाळला आहे. त्यामुळे, वाल्मिकच्या अडचणीत आणखी वाढ झाली असून तुरुंगातून त्याची सुट्टीच नाही, हे स्पष्ट झालं आहे. दरम्यान, सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आल्यानंतर बीडसह राज्यभरातून संतापाची लाट पाहायला मिळाली. विधिमंडळातही हे प्रकरण चांगलंच गाजलं होतं. त्यानंतर, बीडमधील नेते आणि आमदार धनंजय मुंडेंना आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा देखील द्यावा लागला. बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली होती. त्यानंतर वाल्मिक कराड सह सर्व आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. या हत्या प्रकरणी क्रमांक एकचा आरोपी वाल्मिक कराड आणि इतर आरोपी कारागृहात असून, वाल्मिक कराडने या हत्या प्रकरणातून मला दोष मुक्त करावं, अशी न्यायालयाकडे मागणी केली होती. यावर गेल्या दोन महिन्यापासून बीड न्यायालयात सुनावणी सुरू होती. मात्र, आज अखेर न्यायालयानं त्याचा जामीन अर्ज फेटाळून लावल्यानं चर्चेला उधान आलं आहे. तसेच विष्णू चाटेच्या अर्जाबाबत आद्याप काहीच निर्णय समोर आलेला नाहीय. मात्र, वाल्मिक कराड याचा जामीन अर्ज अखेर न्यायालयानं आज फेटाळून लावला आहे. यामुळे वाल्मिक कराड याचे वकील यांनी उच्च न्यायालयात जामीनासाठी अर्ज दाखल करणार असल्याचं सांगण्यात येत आहे.दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख माध्यमांशी बोलताना म्हणाले की, आरोपी कृष्णा आंधळे अद्यापही फरार आहे. त्याच्या शोधात पोलीस यंत्रणा लागली





आहे. मात्र तो कुठे लपून बसला आहे, हे अद्याप समजलं नसल्यानं धनंजय देशमुख यांनी तपास यंत्रणेवर नाराजी व्यक्त केली आहे. आरोपी कृष्णा आंधळे तपास यंत्रणेच्या लक्षात राहिला नसल्याचा आरोप धनंजय देशमुख यांनी केला आहे. ते पुढे बोलताना म्हणाले की, या प्रकरणाबाबत मी वेळोवेळी तपास यंत्रणेला संपर्क करून या आरोपीच्या संदर्भात पाठपुरावा करतोय. परंतु त्याचा कुठेच थांगपत्ता लागत नसल्याचं उत्तर या यंत्रणेकडून येत आहे, असं धनंजय देशमुख यांनी म्हटलं आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ग्रीन टी मध्ये मिक्स करा हे ५ पदार्थ, चटकन् फुटतील पोटावरचे चरबीचे टायर्स,

झटपट होऊ लागेल पूर्ण शरीराचं वेटलॉस.... लग्नसराईचा मौसम लवकरच येतोय आणि या मौसमात प्रत्येकालाच वाटतं की आपण छान दिसावं. प्रत्येकाला आपले व्यक्तिमत्त्व सडपातळ आणि आकर्षक वाटावे अशी इच्छा असते. पण नेहमीप्रमाणे इथे एक अडथळा उभा राहतो ती म्हणजे वाढलेली पोटाची चरबी. आरशात दिसणारे थोडीसे बाहेर आलेले पोट सगळी मजा हिरावून घेते. फिट दिसण्यासाठी लोक जीमपासून डाएटपर्यंत अनेक उपाय करतात, तरीही काहीसा कंटाळा येतो विशेषतः वजन घटवण्यासाठी रोज-रोज ग्रीन टी पिणाऱ्यांना तर त्याचा स्वादही बोचू लागतो. मग प्रश्न पडतो, एकसुरीपणा टाळून वजन कमी कसे करायचे? याचं उत्तर आहे ग्रीन टीमध्ये काही नैसर्गिक घटकांचा जादुई संगम. हे फक्त स्वाद बदलणार नाहीत, तर वजन घटवण्याच्या प्रवासाला गती देतील.

### लिंबाचा ताजेपणा

ग्रीन टीमधील अँटिऑक्सिडंट्स आधीच शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्याचे काम करतात. पण त्यात काही थेंब लिंबाचा रस टाकला की परिणाम दुप्पट होतो. लिंबामधील व्हिटॅमिन शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवते, चयापचयाला गती देते आणि चरबी वितळवण्यात मदत करते. नियमितपणे सकाळी एक कप लिंबू घातलेली ग्रीन टी घेतली, तर पोटाभोवती साठलेली चरबी लवकर कमी होते. त्याचबरोबर शरीराला ताजेतवानेपणा आणि पचनास मदत मिळते.

### पुदिन्याची शीतलता

ज्यांना लिंबाचा आंबटसर स्वाद आवडत नाही, त्यांच्यासाठी पुदिन्याची ग्रीन टी उत्तम पर्याय आहे. पुदिन्याच्या पानांत थंडावा आणि हलकेपणा आहे, ज्यामुळे शरीरातील उष्णता कमी होते आणि मन शांत होते. या चहात फार कमी कॅलरीज असतात, त्यामुळे वजन वाढण्याचा प्रश्नच राहत नाही. पुदिन्याच्या पानांनी तयार झालेली ग्रीन टी उन्हाळ्यात थंड पिऊ शकता, तर हिवाळ्यात गरमागरम घेता येते. दोन्ही पद्धतींनी ती ताजेपणा देते आणि वजन नियंत्रित ठेवण्यास मदत करते.

### बर्फाचा ताजेपणा

ग्रीन टी सहसा गरम प्यायची सवय असते, पण काहींना ते जड वाटते. अशावेळी त्यात बर्फाचे तुकडे टाकून थंड करून घेतली तर ती अगदी





वेगळीच एनर्जी देते. आईस ग्रीन टी पिण्याने शरीराला हायड्रेशन मिळते, भूक आटोक्यात राहते आणि कॅलरीजही वाढत नाहीत. उन्हाळ्यात तर हे पेय एक उत्तम हेल्दी ड्रिंक ठरते. रोज एक ग्लास थंडगार आईस ग्रीन टी घेतली, तर शरीर हलकं वाटतं आणि वजन कमी करण्याच्या प्रवासात थोडी मजा वाढते.

### गुलाबपानांचा सुगंध

नेहमीची ग्रीन टी कंटाळवाणी वाटू लागली, तर त्यात गुलाबाची कोवळी पानं टाकून बघा. या पानांनी चहाचा सुगंध आणि चव दोन्ही वाढते. गुलाबपानांमध्ये अँटिऑक्सिडंट्स असतात, जे त्वचेचा निखार वाढवतात आणि शरीराला आतून स्वच्छ ठेवतात. या चहामुळे मन प्रसन्न होते, थकवा दूर होतो आणि ताजेपणा टिकून राहतो. शिवाय हा पेय फ्रिजमध्ये ठेवून थंड प्यायचा पर्यायही आहे, जो वजन कमी करण्याबरोबरच उन्हाळ्यातील तहान भागवतो

---

# टीप लागली, गोट्या महाराजाकडून डोंगरावर गांजाची शेती, सातारा पोलिसांकडून रॅकेट उघड

**छत्रपती संभाजीनगर :** महाराज असल्याचे सोंग करत एकाने चक्क गांजाची शेती केली. महाराजांच्या शेतातून जिल्ह्यात विविध भागात गांजाची विक्री सुरू आहे. सातारा पोलिसांना याची कुणकुण लागताच पोलिसांनी रॅकेटचा पर्दाफाश करत तीन गोण्या गांजा जप्त केला आहे. यातील एकाला अटक केली आहे तर महाराज पसार झाला आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.परमेश्वरानंद उर्फ गोट्या महाराज दहीहंडी असे संशयित व्यक्तीचं नाव आहे. तर लहू बंडूबा मोरे वय २५ राहणार सिंदोर असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. दरम्यान या प्रकरणी सातारा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सातारा गावात दुचाकी वर एक तरुण गांजा विक्रीसाठी येत असल्याची माहिती मिळाली. यावरून पोलीस निरीक्षक कृष्णा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गोविंद एकिलवाले, निर्मला राग, दीपक बचाटे, नंदकुमार




भंडारे, अमलदार सुनील बेलकर, दीपक शिंदे, जगदीश खंडाळकर यांच्यासह पथक तैनात करण्यात आलं.साताऱ्यातील होळकर चौक ते सातारा गाव रस्त्यावर सापळा रचण्यात आला. संशयित व्यक्ती घटनास्थळी आला पोलिसांनी त्याच्याकडून ३८५ ग्राम गांजा पकडला. पोलीस ठाण्यात नेऊन त्याला पाहुणचार दिला. त्यानंतर त्याने गेवराई बुद्रुक येथील डोंगरावर गांजाची शेती असल्याचे सांगितलं. ही शेती परमेश्वरानंद यांची असून तोच गांजा पुरवतो अशी कबुली त्याने दिली.सातारा पोलीस गेवराई येथील डोंगरावर पोहोचले असता जनावरांच्या गोठ्यात तीन गुन्हांमध्ये ३० किलो गांजा आढळून आला. डोंगर परिसरामध्ये परमेश्वरानंद महाराज सापडला नाही. पोलीस जाण्यापूर्वीच तो पसार झाला. परमेश्वरानंद महाराज हा जनावरांना पाळून सेंद्रिय खताची निर्मिती करतो. त्याची विक्री देखील करतो. यासोबत तो राहत असलेल्या डोंगर परिसरामध्ये गांजाचे पीक घेऊन विक्री करतो.

# विवाहाच्या आमिषाने पुण्यातील हॉटेलमध्ये अत्याचार

## सोशल मीडियावर ते फोटो व्हायरल करण्याची धमकी, तरुणीला लुबाडलं

**पुणे :** मॅट्रिमोनी वेबसाइटवर झालेल्या ओळखीतून तरुणीला लग्नाचे आमिष दाखवलं आणि तिला हॉटेलमध्ये बोलावून बलात्कार केला. हा प्रकार इतक्यावरच न थांबता फोटो-व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत तिच्याकडून दोन लाख रुपये उकळण्यात आले. पुणे जिल्ह्यात ही धक्कादायक घटना घडल्याचे उघडकीस आले आहे. तरुणीचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन तिला मानसिक त्रास दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी खराडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अमित गंगाधर शेंडगे, रा. पारगाव, जि. सोलापूर, असे गुन्हा दाखल झालेल्या तरुणाचे नाव असून, पीडित तरुणीने खराडी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी आणि आरोपी यांची ओळख गेल्या वर्षी सप्टेंबर



महिन्यात एका मॅट्रिमोनी वेबसाइटवर झाली. विवाहाचे आमिष दाखवून शेंडगेने तरुणीला विश्वासात घेतले. त्यानंतर तो पुण्यात आला आणि तरुणीची भेट घेऊन तिला एका हॉटेलमध्ये नेले. तेथे त्याने तिच्यावर बलात्कार केला आणि मोबाइलमध्ये छायाचित्रे काढली.यानंतर शेंडगेने छायाचित्रे तरुणीचे नातेवाईक व समाज माध्यमांवर प्रसारित करण्याची धमकी देऊन तरुणीकडून दोन लाख रुपये उकळले. पीडित तरुणीने विवाहाबाबत विचारणा केली असता आरोपीने विषारी औषध पिऊन आत्महत्या करीन आणि तुझे व तुझ्या कुटुंबीयांचे नाव चिठ्ठीत लिहीन, अशी धमकी दिली.

# पंजाबमध्ये भीषण पूर, १३०० गावं बुडाली, ३० जणांचा मृत्यू; आजही पावसाचा रेड अलर्ट, चिंता वाढली

**चंदीगड:** पंजाब गेल्या महिन्याभरापासून भीषण पूर संकटाला तोंड देत आहे. गेल्या महिनाभरात राज्यात पुरामुळे ३० जणांचा मृत्यू झाला आहे आणि २.५६ लाखांहून अधिक लोक प्रभावित झाले आहेत. राज्य सरकारने याला दशकांमधील सर्वात गंभीर नैसर्गिक आपत्ती म्हणून घोषित केलं आहे. राज्यातील सतलज, बियास आणि रावी नद्यांच्या पाण्याच्या पातळीत वाढ तसेच नाल्यांमध्ये पाण्याची पातळी वाढल्याने अनेक जिल्ह्यांमध्ये मोठे नुकसान झाले आहे. त्यातच हवामान विभागाकडून आज पंजाबला पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला आहे.पुराचा सर्वाधिक परिणाम अमृतसरमध्ये झालेला दिसत आहे. येथे ३५,००० लोक प्रभावित झाले आहेत. यानंतर, फिरोजपूरमध्ये २४,०१५, फाझिल्कामध्ये २१,५६२, पठाणकोटमध्ये १५,०५३, गुरुदासपूरमध्ये १४,५००, होशियारपूरमध्ये १,१५२, एसएएस नगरमध्ये ७,०००, कपूरथलामध्ये ५,६५०, मोगामध्ये ८०००, जालंधरमध्ये ६५३, मानसामध्ये१६३ आणि बर्नालामध्ये ५९ लोक प्रभावित झाल्याची माहिती आहे. पुरामुळे पठाणकोटमध्ये सर्वाधिक ६ मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. त्यानंतर अमृतसर, बर्नाला, होशियारपूर, लुधियाना, मानसा आणि रूपनगरमध्ये प्रत्येकी तीन जणांचा मृत्यू झाला आहे. बठिंडा, गुरुदासपूर, पटियाला, मोहाली आणि संगरूरमध्ये प्रत्येकी १ जणाचा मृत्यू झाला आहे. पठाणकोटमध्ये अजूनही तीन जण बेपत्ता असल्याची माहिती आहे.यादरम्यान आतापर्यंत, १५,६८८ लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. गुरुदासपूरमध्ये सर्वाधिक ५,५४९ लोकांना वाचवण्यात आले आहे. तर फिरोजपूरमध्ये ३,३२१, फाजिल्कामध्ये २,०४९, अमृतसरमध्ये १,७०० आणि पठाणकोटमध्ये १,१३९ लोकांना





पूरग्रस्त भागातून वाचवण्यात आले. आतापर्यंत पंजाबमध्ये तब्बल १,३०० गावांचं पुरामुळे नुकसान झालं आहे. ज्यामध्ये गुरुदासपूरमध्ये ३२१, अमृतसरमध्ये ८८, बर्नालामध्ये २४, फाजिल्कामध्ये ७२, फिरोजपूरमध्ये ७६, होशियारपूरमध्ये ९४, जालंधरमध्ये ५५, कपूरथलामध्ये ११५, मानसामध्ये ७७, मोगामध्ये ३९ आणि पठाणकोटमध्ये ८२ गावे समाविष्ट आहेत.

पुरात अडकलेल्या लोकांची मदत करण्यासाठी गुरुदासपूर, अमृतसर, फिरोजपूर, फाजिल्का आणि भटिंडा येथे एनडीआरएफची २० पथकं मदतकार्य करत आहेत. लष्कर, पोलिस आणि स्थानिक प्रशासन देखील बचाव कार्यात गुंतले आहे.

## मैत्रिणीमुळे ओळख, पार्टीत भेट अन् सुरु झाला आयुष्याचा नवा अध्याय; अशी आहे प्रिया-शंतनूची फिल्मी लव्हस्टोरी...

**मुंबई** - मराठी मालिका, हिंदी मालिका त्याचबरोबर वेब सीरिजमधून प्रसिद्धी मिळवणाऱ्या प्रिया मराठेचं आज पहाटे चार वाजता निधन झालं. अभिनेत्री काही काळापासून कॅन्सरसारख्या गंभीर आजाराशी झुंज देत होती. प्रियाचं वय ३८ होतं. अभिनेत्रीच्या निधनानं संपूर्ण कलाविश्वावर शोककळा पसरली आहे. प्रियानं अनेक गाजलेल्या मालिकांमध्ये काम केलं. त्याचबरोबर ती पवित्र रिश्ता या हिंदी मालिकेमध्येही झळकली. प्रिया प्रोफेशनल आयुष्यासोबतच वैयक्तिक आयुष्यामुळेही कायम चर्चेत असायची. प्रिया आणि शंतनूची लव्ह स्टोरी खूप खास आहे.सुप्रसिद्ध अभिनेते श्रीकांत मोघे यांचा मुलगा शंतनू मोघे आणि प्रिया मराठेनं २४ एप्रिल २०१२ मध्ये लग्न केलं. दोघांची लव्हस्टोरी हटके आहे. प्रिया मूळची ठाण्याची असून ती शूटिंगसाठी अंधेरीत राहायची. प्रियाची रूममेट शर्वरी लोहकरेमुळे शंतनूसोबत तिची ओळख झाली. शंतनू आणि शर्वरी आई या मालिकेमध्ये एकत्र काम करत होते. मालिका संपण्याच्या वेळेस झालेल्या पार्टीमध्ये शंतनू आणि प्रिया यांची मैत्री झाली. त्या गप्पांनी रंगलेल्या रात्रीनंतर दोघांच्याही नव्या आयुष्याची सुरुवात झाली. त्यानंतर दोघांमध्ये मैत्री वाढली. त्यांच्या मैत्रीचं रूपांतर प्रेमात झालं. दीड वर्षे डेट केल्यानंतर शंतनूने फिल्मी स्टाईलने प्रियाला प्रोपोज केलं.शंतनू प्रियाला फिल्मसिटीमधील एका ठिकाणी घेऊन गेलेला. चांदण्याच्या प्रकाशात गुडघ्यावर बसून फिल्मी स्टाईलने शंतनूने प्रियाला प्रपोज



केलं. प्रियाचं सुद्धा शंतनूवर प्रेम असल्यानं तिनं लगेच होकार दिला. मात्र, शंतनू आणि प्रियाने त्यांचं नातं गुपित ठेवण्याचा निर्णय घेतलेला. दोघांच्याही घरच्यांना त्यांच्या या नात्याबद्दल काहीच माहित नव्हतं. पण, एका पुरस्कार सोहळ्यादरम्यान शंतनूने स्टेजवरच प्रियाचं नाव घेतलं आणि घरच्यांना त्यांच्या रिलेशनशिपबद्दल समजलं. दोन्ही कुटुंबाकडून होकार असल्यामुळे त्यांचं लग्न थाटामाटात पार पडलं. शंतनू आणि प्रिया हे इंडस्ट्रीतील लोकप्रिय जोडप्यांपैकी एक होतं. मात्र, आता प्रियाच्या जाण्यानं शंतनू आणि कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.दरम्यान, प्रियाच्या कामाबद्दल सांगायचं तर तिनं २००५ मध्ये या सुखांनो या या मालिकेतून छोट्या पडद्यावर पदार्पण केलं. त्यानंतर ती चार दिवस सासूचे, तुझेच मी गीत गात आहे, तू तिथे मी यांसारख्या मालिकांमधून प्रेक्षकांच्या भेटीला आलेली. त्याचबरोबर प्रियाने कसम से या मालिकेतून हिंदी मालिकांमध्ये काम करण्यास सुरुवात केली.

## यालाच म्हणतात दिवानगी! विराट-रोहितची क्रेझ संपेना

**मुंबई:** भारतीय दिग्गज खेळाडू रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी कसोटी क्रिकेट आणि टी-२० मधून निवृत्ती घेतली आहे. या दोन्ही खेळाडूंची क्रेझ पूर्ण जगभरात पाहायला मिळेल.




भारताचे हे दोन खेळाडू आता वनडे फॉरमेटमध्ये खेळताना दिसणार आहे. रोहित आणि विराट आता वनडे विश्वचषक खेळताना दिसणार असून त्यानंतर निवृत्ती जाहीर करतील असे म्हटले जात आहे. विराट आणि रोहितची क्रेझ पुन्हा एकदा अनुभवयाला मिळत आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने वृत्त दिले आहे की भारताविरुद्धच्या आगामी मर्यादित षटकांच्या मालिकेसाठी सर्व आठ ठिकाणांची तिकीटे भारतीय चाहत्यांनी विकत घेतली आहेत, तर मालिका सुरू होण्यास अद्याप ५० दिवस बाकी आहेत. हे दोन्ही क्रिकेट दिग्गजांमधील सामन्यासाठी चाहत्यांचा किती उत्साह आहे हे यावरुन दिसत आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने वृत्त दिले आहे की सिडनी आणि कॅनबेरा सामन्यांची सार्वजनिक तिकिटे देखील आधीच पूर्णपणे बुक झाली आहेत. या दौऱ्यात भारत तीन एकदिवसीय आणि पाच टी-२० सामने खेळेल१९ ऑक्टोबर रोजी पर्थमध्ये पहिल्या एकदिवसीय सामन्याने दौऱ्याची सुरुवात होईल. क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे कार्यकारी महाव्यवस्थापक (इव्हेंट्स आणि ऑपरेशन्स) जोएल मॉरिसन म्हणाले की, ङ्क्षआठही ठिकाणी भारतीय फॅन्सने मोठी बुकिंग केली आहे. या मालिकेसाठी चाहत्यांचा उत्साह पाहून आम्हाला खूप आनंद झाला आहे. आम्ही जागतिक दर्जाच्या सामन्याची आतुरतेने वाट पाहत आहोत.ङ्क्ष् आता विराट आणि रोहित वनडे विश्वचषक खेळून निवृत्ती जाहीर करतील असे म्हटले जात आहे. पण ऑस्ट्रेलिया दौरा हा त्यांचा शेवटचा दौरा असून त्यानंतर ते निवृत्ती घेतील अशीही अटकळ बांधली जात आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मेहकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये विविध पदांसाठी ८ सप्टेंबर रोजी मुलाखती उमेदवारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मेहकर, जि. बुलडाणा येथे विविध पदासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. उमेदवारांनी दि. ८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजेपर्यंत आयटीआय मेहकर येथे मुळ कागदपत्रांसह प्रत्यक्ष मुलाखतीसाठी हजर राहावे, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य व्ही.बी. शिरसाट यांनी केले आहे. सोलर टेक्निशियनचे(इलेक्ट्रीकल) २ पदे(ठोक मासिक वेतन), जोडारीचे १ पद(तासिका तत्वावर), इम्प्लॉयबिलिटी स्कील/कॉम्प्युटर ऑपरेटर १ पद (तासिका तत्वावर), मेकॅनिक इलेक्ट्रीक व्हेईकल १ पद(ठोक मासिक वेतन). सर्व पदांसाठी लेव्हलनुसार ट्रेड सिलेबसप्रमाणे पात्रता आवश्यक आहे. तसेच किमान एक वर्षाचा अनुभव असणे बंधनकारक आहे. याआधी सदर पदांसाठी मुलाखत दिलेल्या उमेदवारांनी अर्ज करु नये. असे अर्ज ग्राह्य धरला जाणार नाही, यांची नोंद घ्यावी. तासिका व मासिक वेतन हे डिजिइटी () च्या मानदंडानुसार देण्यात येईल. निवड प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार हे प्राचार्य, आयटीआय मेहकर यांचेकडे राहतील.

# ईद-ए-मिलाद व गणेश विसर्जनाच्या दिवशी मद्य विक्रीवर बंदी

## जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश; उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई होणार

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यात आगामी ईद-ए-मिलाद, अनंत चतुर्दशी व गणेश विसर्जन या दिवशी कोरडा दिवस अर्थात मद्य विक्री बंदीचा आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जारी केला आहे. महाराष्ट्र दारुबंदी कायद्याअंतर्गत जारी आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व देशी व विदेशी मद्य विक्री अनुज्ञप्तीधारकांची दुकाने बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.यानुषंगाने जिल्ह्यातील एफएल-२, एफएल-३, एफएल-४, एफएल/बीआर-२ व सीएल-३ अनुज्ञप्तीधारकांना आपली दुकाने व मद्य विक्री केंद्रे संबंधित दिवशी बंद ठेवण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तसेच आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकाविरुद्ध कडक कारवाई केली जाईल, असा इशाराही जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे. या दिवशी राहणार कोरडा दिवस

५ सप्टेंबर २०२५ (शुक्रवार): ईद-ए-मिलाद निमित्त संपूर्ण दिवस दारूबंदी. ६ सप्टेंबर २०२५ (शनिवार): अनंत चर्तुदशीच्या दिवशी कायद्यानुसार दारूबंदी लागू.


७ व ८ सप्टेंबर २०२५: ज्या दिवशी व ठिकाणी गणेश विसर्जन होईल, त्या ठिकाणी विसर्जन सोहळा पूर्ण होईपर्यंत दारूबंदी राहणार आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना या आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक उत्सव काळात अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्रीवर देखील बारीक लक्ष ठेवावे, असे आदेशात नमूद केले आहे. याव्यतिरिक्त, संबंधित कार्यक्षेत्रात काही अनुचित घटना घडल्यास त्याबाबत संबंधित दुय्यम निरीक्षकांना थेट जबाबदार धरले जाईल, असा इशारा देखील अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी दिला आहे.

# खामगाव शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये प्रशिक्षण २ सप्टेंबरपासून सुरू




**जनसंचलन/बुलढाणा**

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खामगाव येथे ऑगस्ट २०२५ मध्ये प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण २ सप्टेंबरपासून नियमित सुरू झाले आहे. प्रवेशित सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खामगाव यांनी केले आहे.




# वृत्तेश्वर गणेशोत्सव मंडळ, बुलढाणा जिल्हा पत्रकार संघ आणि थायोकेअर लॅब यांच्या संयुक्त विद्यमाने..

## बुलढाण्यात मोफत थायरॉईड तपासणी शिबिर 3 सप्टेंबरला

**जनसंचलन/बुलढाणा**



शहरातील नागरिकांसाठी एक महत्त्वपूर्ण आरोग्य उपक्रम राबवण्यात येत आहे. वृत्तेश्वर गणेशोत्सव मंडळ, बुलढाणा जिल्हा पत्रकार संघ आणि थायोकेअर लॅब यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत थायरॉईड तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर ३ सप्टेंबर,, बुधवार रोजी सकाळी ९ वाजता जिल्हा पत्रकार भवन, सैनिकी मंगल कार्यालयाजवळ, बस स्टॅन्ड समोर, बुलढाणा येथे होणार आहे. थायरॉईड विकारांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून अनेकांना याची जाणीव होत नाही. हायपरथायरॉईडीझम व हायपोथायरॉईडीझम ही दोन प्रमुख प्रकारची थायरॉईड विकारे असून त्यांची लक्षणे वजन कमी होणे, घाम येणे, झोप न लागणे, हात थरथरणे, जलद हृदयगती, चिंता व अशक्तपणा, थकवा, सुस्ती, वजन वाढणे, थंडी वाजणे, बद्धकोष्ठता, कोरडी त्वचा, मासिक पाळीतील अडचणी, वंध्यत्व इत्यादी. या लक्षणांपैकी कुठलेही लक्षण जाणवल्यास नागरिकांनी या तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा. तपासणीसाठी येताना आधार कार्ड सोबत आणणे आवश्यक आहे. हा उपक्रम नागरिकांच्या आरोग्यविषयक जागरूकतेस चालना देणारा असून, या शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्वर्गीय भोंडे जलाशय तुडूंब!

## पाण्याची चिंता नाही, ५ गेट उघडले!




**जनसंचलन/बुलढाणा**

यंदाच्या पावसाळ्यात सप्टेंबरच्या उंबरठ्यावरच झालेल्या दमदार पावसामुळे शहराला पाणी पुरवठा करणारे स्वर्गीय भोंडे जलाशय १०० टक्के भरल्याने परिसरातील १५ गावांचा वर्षभराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला आहे. जलाशयाचे ५ गेट उघडण्यात आले आहे. बुलढाणा चिखली राज्यमार्गावर असलेल्या येळगाव धरणावरून शहर व परिसरातील १५ गावांना नगरपालिकेद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. शहरी भागात नगरपालिकेद्वारे काही भागात जुनी पाइपलाइन तर काही भागात थ्री व्हॉल्व्ह सिस्टीमद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. यासाठी शहर परिसरातील येळगाव धरणातून जलशुद्धीकरण केंद्र व या केंद्रातून शहरातील जलकुंभात पाणी येते. या जलकुंभात शहर परिसरात चवथ्या व पाचव्या दिवशी पाणीपुरवठा करण्यात येत आहे. गेल्या चार-पाच दिवसांपासून पैनगंगा नदीच्या ङ्कॅचमेंटफ क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसाने नदीला पूर आला आणि येळगाव धरणात पाणीसाठ्याची क्षमता १२.४० दलघमी असून, यावर्षी सप्टेंबरच्या सुरुवातीलाच धरण जवळपास १०० टक्के भरले आहे.

# अवैध सावकारी व फायनान्स कंपनी च्या माध्यमातून अनेकांची लाखोंची फसवणूक

## अखेर ग्रामपंचायत समोर बेमुदत आमरण उपोषण सुरू....

जनसंचलन/ डोणगांव

स्थानिक किराणा व्यवसायीक , व्यापारी, लघुउद्योजक, शेतकरी बांधवासह अनेकांची दैनंदिनी बिसी, अवैध सावकारी व फायनान्स च्या माध्यमातून लाखोंचा व्यवहार झाला असुन त्यात फसवणूक झाल्याची तक्रार जिल्हा सहाय्यक निबंधक, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक ,आयकर विभाग, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार सह स्थानिक पोलीस स्टेशन ला संदीप नारायण पळसकर, गजानन सखाराम पांडव,संजय विष्णू परमाळे, सुरेश दसरथ गवळी ,अमजद खान यांनी दिली असुन अखेर न्याय मिळण्यासाठी ग्रामपंचायत समोर आमरण उपोषण दि २ सप्टेंबर पासून सुरू केले आहे,

डोणगांव येथील गजानन त्रंबक आखाडे सदर्हू व्यक्ती श्रीराम चिट्स फायनान्स कंपनी चे एजन्ट, व रिटर्न काढणे चे काम पाहत आहेत, श्रीराम फायनान्स च्या माध्यमातून अवैध बिसी, सावकारी, दैनंदिनी व्यवहार करुन त्यांनी आमची लाखो रुपयांची फसवणूक केली आहे,अशी तक्रार संदीप नारायण पळसकर सह अनेकांनी केली आहे,मी तुमची श्रीराम फायनान्स कंपनी मध्ये केस करुन देतो,सुलभ हप्ते किवा दैनंदिनी व्यवहार करुन आपण कर्ज फेडु शकता,अश्या थापा देवून फायनान्स ची केस करुन दिल्या नंतर तिन चार हप्ते भरुन घेतल्यानंतर कोरे चेक घेऊन न विश्वासात घेता विड्राल करुन पैसे काढुण घेण्यात आले आहे, तुम्हाला पैश्याचे काम पडल्यावर पैसे देतो,तुमचा सर्व हिशोब पाहु,तुमचा विमा काढला आहे असे उडवा उडवी चे उत्तर देवुन आमची फसवणूक करण्यात आली आहे असे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे, या संदर्भात दि १०/०२/२०२५ ला सुध्दा तक्रार दिली होती अद्याप यावर कोणतीच दखल घेण्यात आली नाही, दि ०२ सप्टेंबर सकाळ पासून सुरू झालेल्या या आमरण उपोषणाला ठाणेदार अमरनाथ नागरे यांनी भेट दिली असता उपोषण पासुन मनपरिवर्तन करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला असता ते उपोषणावर ठाम होते,पुढील कार्यवाही साठी




वरिष्ठाचे मार्गदर्शन घेण्यात येईल व न्याय देण्याचा प्रयत्न राहील या उपोषण मंडळाला डोणगांव नगरीतील अनेक सामाजिक कार्यकर्ते, राजकीय मंडळी व पत्रकार मंडळीने भेट दिली

## देऊळगाव माळी येथे भव्य आरोग्य शिबिर संपन्न

जनसंचलन/ देऊळगाव माळी

श्री मारुती गणेश मित्र मंडळ व श्री. पांडुरंग संस्थान यांच्या संयुक्त विद्यमानाने तसेच डॉक्टर असोसिएशन व देऊळगाव माळी येथील सर्व फार्मासिस्ट यांच्या विषयी सहकार्याने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भव्य मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप शिबिर संपन्न झाले. या शिबिरामध्ये परिसरातील शेकडो रुग्णांनी लाभ घेतला. झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पांडुरंग संस्थानचे अध्यक्ष बाबुरावजी बळी, हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून पांडुरंग कृपा संगीत भजनी भारुड मंडळाचे ह.भ.प.प्रकाश महाराज मगर, टी.एल.मगर, व आदी मान्यवरांची उपस्थिती होती. सदरील महाआरोग्य शिबिरामध्ये डॉ.अनिल कुमार गाभणे हृदयरोग तज्ञ गाभणे हॉस्पिटल मेहकर,डॉ.विजयकुमार गिऱ्हे दंत रोग तज्ञ व सर्जन छत्रपती संभाजीनगर,डॉ.सातपुते साहेब अस्थिरोग तज्ञ मेहकर,डॉ. प्राची वि. गिऱ्हे दंतरोगतज्ञ छत्रपती संभाजी नगर,डॉ.अविनाश सुरूशे कॅन्सर तज्ञ जालना संजीवनी हॉस्पिटल,डॉ. ऐश्वर्या अविनाश सुरुशे त्वचारोग तज्ञ संजीवनी हॉस्पिटल जालना,डॉ. अनंता मगर एम एस सर्जन मगर हॉस्पिटल बुलढाणा,डॉ. राधिका अनंता मगर जनरल फिजीएशन बुलढाणा,डॉ.विशाल मगर हृदयरोग तज्ञ मगर हॉस्पिटल सा.खेर्डा,डॉ. अश्विनी विशाल मगर स्त्री रोग तज्ञ,डॉ.विशाल सुरुशे बालरोग तज्ञ वरद हॉस्पिटल मेहकर,डॉ.मयुरी विशाल सुरुशे दंत रोग तज्ञ वरद हॉस्पिटल मेहकर,डॉ.विनायक मगर हृदयरोग तज्ञ मगर हॉस्पिटल मेहकर,डॉ.प्रिया विनायक मगर स्त्रीरोग तज्ञ व प्रसूती व नवजात शिशु तज्ञ,डॉ.सुनंदा दिगंबर भराड एम एस सर्जन,डॉ.अरुण गिऱ्हे नेत्र रोग तज्ञ साखरखेर्डा,डॉ.पूजा अरुण गिऱ्हे स्त्री रोग तज्ञ साखरखेर्डा,डॉ.अनुजा प्रमोद मगर वैद्यकीय अधिकारी यवतमाळ,डॉ. पल्लवी गाभणे स्पीच थेरेपी बहिरेपणा तोत्रेपणा कान संबंधी कोणत्याही विकारासाठी तज्ञ,डॉ. श्यामबाला गिऱ्हे स्त्री रोग तज्ञ,डॉ. यश राजेश मगर दंत रोगतज्ञ,डॉ. सुनील सुलताने वैद्यकीय अधिकारी देऊळगाव माळी,डॉ. डि. व्हि.सुरूशे जनरल फिजिशियन,तज्ञ,डॉ.डी. पी साबळे अशा तज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची मोफत तपासणी करून त्यांच्यावर उपचार करण्यात आले. व मोफत औषध वाटप करण्यात आले. सदरील आरोग्य शिबिर संपन्नतेसाठी श्री मारुती गणेश मित्र मंडळाचे सर्व कार्यकर्ते, दे.माळी येथील सर्व फार्मासिस्ट, डॉ. असोसिएशन, यांनी परिश्रम घेतले.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणुकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४